Review Of Research
Vol. 3, Issue. 2, Nov. 2013
ISSN:-2249-894X Available online at www. lbp.world

ORIGINAL ARTICLE

# ऐतिहासिक पर्यटन स्थळ वासोटा उर्फ व्याघ्रगड

**प्रा.डॉ. विश्वनाथ पवार**
**छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.**

**वासोटयाचा इतिहास :**

सातारा जिल्हयात जावळी तालुक्यात कोयनेची उपनदी कांदाटी नदीच्या खोऱ्यात निबीड अरण्यात वसलेला किल्ला वासोटा उर्फ व्याघ्रगड होय. वासोटा हे वनदुर्गाचे उत्तम उदाहरण होय. किल्याची समुद्रसपाटीपासूनची उंची ११२८ मीटर आहे.[१] कोल्हापूरच्या शिलाहार घराण्यातील पन्हाळयाचा राजा भोज दुसरा (११७८—११९३) याच्या काळापासून किल्ल्याबाबतची माहिती मिळते.

**शिवकालखंड :**

मराठा कालखंडात वासोटा किल्ला शिरकानच्या शिर्केच्या तर त्यानंतर जावळीच्या मोऱ्यांच्या ताब्यात आला. छ.शिवाजी महाराजांनी यशवंतराव मोरेचा पाडाव करुन २७ जानेवारी १६५६ रोजी जावळी प्रांत स्वराज्यात आणला.[२]यामुळे जावळी प्रांतातील वासोटा किल्ला छ.शिवाजी महाराजांच्या ताब्यात आला महाराजांनी वासोटा हे नाव बदलून 'व्याघ्रगड' हे नाव दिले. नरवीर तानाजीच्या बलिदानाने किल्ले कोंढाणा 'सिंहगड' या नावाने इतिहासावर आपली मुद्रा उमटवू शकला, मात्र ते भाग्य व्याघ्रगडाच्या नशिबी आले नाही.

अफजलखानाच्या वधानंतर अवघ्या अठराव्या दिवशी २८ नोव्हेंबर १६५९ रोजी महाराजांनी पन्हाळा जिंकून घेतला.[३]मार्च १६६० मध्ये महाराज पन्हाळयावर असताना सिद्दी जोहरने किल्ल्याला वेढा दिला. या युद्धात सिद्दी जोहरच्या मागणीवरुण रेव्हिंग्टन, मिघॅम, गिफर्ड व दुभाषा वेलजी या राजापूरच्या इंग्रज व्यापाऱ्यांनी आपले निशान उभारुन पन्हाळयावर तोफांचा मारा केला.[४]महाराजांनी पन्हाळयाहून सुटकेनंतर इंग्रजांना शासन करण्यासाठी चार हजार स्वारांसह राजापूरच्या वखारीवर हल्ला चढविला. वखार प्रमुख रेव्हिंग्टन त्याचे साथीदार रॅडॉल्फ टेलर, रिचर्ड टेलर, गिफर्ड, फेरांड, रिचर्ड नेपियर व सॅम्युएल बर्नार्ड यांना गिरफदार करण्यात आले. त्यांची संपत्ती जप्त करण्यात आली. नेपियर व बर्नार्ड वगळता इतर कैदयांना 'वासोटा' किल्ल्यावर ठेवण्यात आले.[५] महाराजांनी कैदयांची व्यवस्था उत्तम प्रकारे ठेवली होती. पुढे जानेवारी १६६३ मध्ये या कैदयांची सुटका करण्यात आली. दि. २७ सप्टेंबर १६७८ मध्ये वासोटयावर चार घागरी मोहरा म्हणजे अंदाजे २६००० रुपयांचे गुप्तधन महाराजांना मिळाले.

जून १७०० मध्ये औरंगजेबाने परळीचा किल्ला घेतला. तत्पूर्वी किल्ल्यावरील राममूर्ती वासोटयावर हलविण्यात आली. पुढे १७०४ मध्ये किल्ला मराठयांच्या ताब्यात येताच वासोटयावर नेण्यात आलेल्या राममूर्तीची परळी (सज्जनगडावर) स्थापना करण्यात आली.[६]

**पेशवे काळ:**

इ.स. १८०६ मध्ये पेशवा दुसरा बाजीराव याच्या हुकमावरुन बापू गोखलेने पंतप्रतिनिधीस पकडून मसूरच्या गढीत ठेवले.[७] पंतांची रखेली ताईतेलीण हिने वासोटा काबीज केल्यावर मसूरवर हल्ला चढविला व पंतप्रतिनिधीस सोडवले, परंतु वसंतगडाच्या पायथ्याशी झालेल्या लढाईत बापू गोखलेंनी पंतप्रतिनिधींना पुन्हा कैद केले.[८] याधुमश्चक्रीमध्ये ताई तेलीणीने निसटून वासोटा किल्ल्याचा आश्रय घेतला, ताईला धडा शिकवण्यासाठी बापूने वासोटयावर हल्ला चढविला.. आठ महिने त्याने शिताफिने किल्ला लढविला. धान्याचे कोठार जळाल्यामुळे नाईलाज होऊन ताईतेलीण बापू गोखलेस शरण गेली.[९] बापू गोखलेने वासोटयाबाबत एका पत्रात लिहिले आहे की, 'डोंगर झाडी मनस्वी, अडचण बहुत! किल्ला बहुत बाका! सात कोस अडीच मास झाडी तोडली तेव्हा मार्ग जाला.' एका जुन्या आर्येमध्ये वासोटयाबाबत गंमतदार उल्लेख आला आहे.

श्रीमंत प्रतिनिधींचा हा अजिंक्य किल्ला वासोटा ।
ताईतेलीण मारील सोटा, बापू गोखल्या सांभाळ कासोटा ।।

इ.स. १८१७ मध्ये बापू गोखलेने मॉरिसन व हंटर या इंग्रज अधिकाऱ्यांना पकडून वासोटा किल्ल्यावर कैदेत ठेवले होते.[१०] नोव्हेंबर १८१७ च्या खडकीच्या लढाईत दुसऱ्या बाजीरावाचा पराभव होताच त्याने छ. प्रतापसिंह व त्यांच्या कुटुंबियांना वासोटा किल्ल्यावर ठेवले होते. पुढे दुसऱ्या बाजीरावाने एकटया छ. प्रतापसिंहांना बरोबर घेऊन पंढरपूरास पलायन केले. यानंतर अल्पावधीतच ६ मार्च १८१८ रोजी एल्फिस्टनने किल्ला आपल्या ताब्यात घेतला.[११]

**पर्यटन स्थळ वासोटा:**

वनदुर्ग वासोटा कोयना जलाशयाच्या पश्चिमेस कांदाटी नदीच्या खोऱ्यात आहे. किल्ल्याजवळ वासोटा नावाचे गाव असले तरी किल्ला मेट इंदवली गावाच्या हद्दीत आहे. वासोटयास देशावरुन सातारामार्गे बामणोलीस व बामणोलीहून लॉचने सव्वा ते दीड तासांत मेट इंदवलीस व तेथून वासोटयास जाता येते. तर कोकणातून चिपळूण—चोरवणे मार्गे वासोटयास येता येते. वासोटा मार्गात वनखात्याने पर्यटकांच्या सोयीसाठी मार्गदर्शक फलक लावले आहेत. तंबूंची सोय केली आहे. वासोटयाच्या मार्गावर सुरुवातीस मारुती व गणपती मंदिर लागते. त्याच्या पाठीमागील असणाऱ्या झऱ्यातील थंड पाण्याची चव फार अवीट आहे. किल्ला चढणीच्या मार्गावर ठिकठिकाणी खडकात पायऱ्या खोदल्या आहेत. किल्ल्याच्या उत्तर टोकाला दोन पूर्वाभिमुख प्रवेशद्वारे आहेत. प्रवेशद्वारातून काही पायऱ्या चढून आत गेल्यावर किल्ल्याचे पठार लागते. किल्ल्याचे माथ्यावरील क्षेत्रफळ ६.०७ हेक्टर आहे[१२]

किल्ल्याच्या उत्तरेला चंडकी देवीचे देऊळ असून त्यापुढे १२.१९ मीटर व्यासाची व ४.५७ मीटर खोलीची दगडी पायऱ्यांची पुष्करीणी पाहावयास मिळते.[१३] किल्ल्यावर आणखी एक पुष्करीणी आहे. पुष्करीणीजवळ महादेवाचे मंदिर आहे. येथे सदरचे अवशेष दिसतात. हाच ताईतेलीणीचा वाडा असावा. याबरोबर धान्य कोठार, दारु कोठार अशा पडझड झालेल्या वास्तू पाहावयास मिळतात.

किल्ल्याच्या उत्तरेकडील भाग किल्ल्याच्या उंचीपेक्षा ९.१४ मीटर खाली आहे.[१४] येथून टेहळणी केली जाई.

किल्ल्याच्या दक्षिणेकडील खिंडीपलिकडे एक जुना किल्ला आहे. जुन्या किल्ल्यास तटबंदी नाही व येथे अवशेषही पाहावयास मिळत नाहीत. या किल्ल्याच्या पश्चिम बाजूस ४५७ मीटर उंचीचा रौद्र भीषण बाबू कडा दिसतो.[१५] तो महाबळेश्वराच्या ऑर्थर सीट पॉईंटपेक्षाही उंच आहे. येथून कोकणचे विहंगम दृश्य पाहावयास मिळते. दरीतून तुफान वारे वर उफाळत असते. येथे प्रतिध्वनींचा प्रत्यय आपणास येतो. आकाशात नागाच्या फण्याप्रमाणे झेपावलेले नागेश्वर गुहेचे गिरीशिखर दृष्टीस पडते.

वासोटा उतरल्यावर परतीच्या वाटेवर नागेश्वर फाटा लागतो. कारवीच्या दाट जंगलातून आपण नागेश्वराचा शेवटचा टप्पा अगदी कडा असून चोरवणे गावच्या ग्रामस्थांनी येथे पायऱ्या बांधल्या आहेत. या पायवाटेने प्रशस्त अशा गुहेत आपण प्रवेश करतो. सुरक्षेच्या दृष्टीने गुहेच्या तोंडाला लोखंडी ग्रील लावण्यात आले आहेत. गुहेच्या मध्यभागी शिवलिंग असून गुहेच्या छतावरुन बाराही महिने पिंडीवर जलाभिषेक होत असतो. गुहेमध्ये फरशी टाकून पर्यटकांच्या मुक्कामाची सोय केली आहे. मात्र मुक्कामासाठी बामणोली वनखात्याची परवानगी आवश्यक आहे.

वासोटयास येता जाता आपणास कोयना जलाशयातून प्रवास करावा लागतो. कोयना जलाशयाचे स्वच्छ निळेशार पाणी, जलाशयाच्या पूर्व व पश्चिमेकडील सहयाद्रीचे उंचच उंच कडे, गर्द हिरवीगार वनराई पाहताना आपण भान हरपून जातो. वासोटयाच्या परिसरातील जंगल ‘अस्वलाचे जंगल’ म्हणून प्रसिद्ध आहे. अस्वलांचा, गवारेडयांच्या हा खास हुकमतीचा प्रदेश होय. जगभरात दुर्मिळ म्हणून ओळखली जाणारी मलबार खार म्हणजे शेकरु येथे आपणास पाहावयास मिळते. कोयना अभयारण्यातील २००३ च्या वन्यप्राणी मोजणीनुसार पट्टेरी वाघ ६, बिबटे २१, गवे ४९४ ते ९९६, अस्वले ४७ ते १५२, सांबर ८८ ते २८८, भेकर १३१ ते २९२ व शेकरु ४० ते १४९ अशी संख्या आहे.[१६]

**सारांश:**

पश्चिम घाट हा जैवविविधतेने नटलेला आहे. कोयना अभयारण्यातील वासोटा हा त्याचे आगर आहे. येथे हजारो प्रकारची वृक्षवेली आहेत. असंख्य वन्य प्राणी, पक्षी, फुलपाखरे, जलचर पर्यटकांचे आकर्षण ठरले आहेत.

**संदर्भसूची :—**

१. डॉ. पाठक अरुणचंद्र (संपा.) सातारा जिल्हा गॅझेट, पृ.८८१
२. सरदेसाई गो.स., पूर्वोक्त खंड १, पृ.१६४—१६५
३. देशपांडे प्र.न., छ. शिवाजी महाराज पृ.२८
४. सरदेसाई गो.स., मराठी रियासत खंड १, पृ. २०८—२०९
५. इंग्लिश रेकॉर्डस ऑन शिवाजी, खंड १, पत्र २६
६. सरदेसाई गो.स., पूर्वोक्त खंड १, पृ.२७४
७. डॉ. पाठक अरुणचंद्र (संपा.) सातारा जिल्हा गॅझेट, पृ.८९२
८. सरदेसाई गो.स., पूर्वोक्त खंड १, पृ.३८४
९. कित्ता, पृ.३८६
१०. कित्ता पृ. ५१३
११. डॉ. पाठक अरुणचंद्र (संपा.) सातारा जिल्हा गॅझेट, पृ.८८२
१२. डॉ. पाठक अरुणचंद्र (संपा.) सातारा जिल्हा गॅझेट, पृ.८८१

१३. कित्ता पृ. ८८१
१४. कित्ता पृ. ८८१
१५. कित्ता पृ. ८८१
१६. कोयना अभयारण्य वन्यप्राणी मोजणी २००३ नुसार